REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# छत्रपती शिवाजी महाराज व भारतीय आरमार निर्मातीः एक ऐतिहासीक पैलू

डॉ. उज्जवला दि. गोंडाणे
इतिहास विभाग प्रमुख,
श्री. निकेतन कला वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

**सारांश**

स्वराज्य स्थापन करीत असताना स्वराज्यातील बहुतांश भाग हा आदिलशहाच्या वर्चस्वाखाली येत होता. त्यामुळे आदिलशहाशी शिवाजी महाराजांचा संघर्ष अटळ होता. शिवाजी महाराजांनी स्वराज्यामध्ये बहुतांश आदिलशहाचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. हे करीत असतांना कोकण किनाऱ्याचा बंदोबस्त लावतांना त्यांना आरमाराची आवश्यकता भासली कारण स्वराज्याचा मुख्य शत्रू आदिलशहा याच्या दरबारातील सिद्दी हा आरमाराच्या सहाय्याने कोकण किनाऱ्यावर शिवाजी महाराजांच्या प्रदेशात सतत लुटपाट करीत असे. याच बरोबर पोर्तुगीज, इंग्रज आणि अन्य पश्चिमात्य सत्ता आरमाराच्या भरोस्यावर भारतातील प्रदेशांवर नियंत्रण ठेवत असत. त्यामुळेच शिवाजी महाराजांनी आरमार निर्माण करण्यावर भर दिला.

**शब्दसंकेत :–** सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज, जंजिरा सिंधूदुर्ग, विजयदुर्ग, सुर्वर्णदुर्ग, राजापूर, खाडी, गलबते, नौका सरखेल.

## प्रस्तावना

आपली सरंक्षण व्यवस्था ही सागरावरसुद्धा मजबूत असली पहिजे हे शिवाजी महाराजांनी प्रथमत:च ओळखले. युरोपीयन सत्तांपासून स्वराज्याला धोका आहे हे ओळखणारा म्हणून शिवाजी महाराजांची जितकी स्तुती करावी तितकी कमीच आहे.सागरावरील इंग्रज, सिद्दी, यांच्यासारख्या शत्रूंच्या हालचाली पाहून शिवाजी महाराजांनी जहाजबांधणीकडे विशेष लक्ष दिल्याचे आढळून येते.

इ.स १६५५–५६ मध्ये जावळीच्या मोऱ्यांचे पारिपत्य केल्यावर रायगवर विजय प्राप्त केला. तेव्हा स्वराज्याची सीमारेषा अरबी सागरला जाऊन भिडली, सिद्द, इंग्रज, पोर्तुगीज, डच व फ्रेंच या सागरी पाश्चिमात्य सत्तांशी स्वराज्याचा संबंध आला. यापूर्वी अहमदनगरच्या निजामशहाने जंजिरा येथे आरमार उभारून सिद्दी याकूतखान नावाच्या ॲबिसिनियास १४९० मध्ये आपला आरमारी सेनापती म्हणून नेमले.[१] सिद्दी ऊर्फ हबशी यांचे प्रमुख आरमारी ठाणे जंजिरा बेटावर होते. जंजिरा हा शब्द जजिरा या अरबी शब्दाचा अपभ्रंश असून त्याचा अर्थ बेट असा होतो. जंजिऱ्याच्या किनाऱ्यावरील दंडा–राजपुरी व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश त्यांच्या ताब्यात होता. हा त्यांच्या ताब्यातील प्रदेश म्हणजे भारतातील हबसाण प्रदेश होय. शिवाजी महाराजांच्या काळात सिद्दी प्रथम विजापूर दरबारतील नोकर होते. पुढे ते मोगली नोकरीत रुजू झाले. त्यांच्याजवळ चांगले आरमार असून त्याच्या देखरेखीकरीता समुद्र किनाऱ्यावरील आपले नियंत्रण असणे आवश्यक आहे असे सिद्दी (हबशी) यांना वाटत होते. याकरीता सिद्दी समुद्रात चाचेगिरी (लुटपाट) करीत आणि कोकण किनाऱ्यावर अचानक धाडी घालून जाळपोळ, लुटालुट व बाटवा–बाटवी करीत हा त्यांचा नित्याचा



उद्योग होते. बायका पळविणे हा या उद्योगातील महत्वाचा उद्योग होता.[२] गोव्याचे पोर्तुगिज सामुद्रिक वर्चस्वामुळ हिंदी महासागरातील नाविक संचारासाठी भारतीय जहाजांना ''पासपोर्ट'' खरेदी करावयास भाग पडीत व नियम मोडणाऱ्यांची जहाजे जप्त करीत. तात्कालीन नियमाप्रमाणे व परंपरेप्रमाणे, नजिकच्या समुद्रात जहाज दुर्घटनेमुळे किनाऱ्यावर वाहून आलेले सामान किंवा वजन कमी करण्यासाठी फेकलेले समान ही सर्व किनाऱ्याशी संलग्न भू–मालकाची (राजाची) संपत्ती मानली जाई हा अधिकार फक्त आरमाराचे जोरावर प्राप्त करणे शक्य होते.[३] शिवाजी राजानी इ.स. १६५७ च्या सुमारास कल्याण–भिवंडी काबीज करून राजापूर पर्यंतचा प्रदेश काबीज केला. त्यामुळे

शिवाजी राजे आणि सिद्दी यांच्या संघर्ष होणे अपरिहार्य झाले. शिवाजीचा बखरकर कृष्णाजी अनंत सभासद यांच्या शब्दात, ''त्यांचे (सिद्याचे) लोकांनी राजियाचे देशास उपद्रव मांडला. .......... पुढे राजियास राजपुरीचे शिद्दी, घरात जैसा उंदीर तैसा शुत्र यास कैसे जेर करावे म्हणून तजवीज पडली.[४] सिद्याचे पारिपात्या करण्याकरीता शिवाजी महाराजांना आरमार उभारण्याची गरज होती. आरमार निर्मितीमुळे इंग्रज, पोर्तुगीज, डच, फेंच या सत्तांना शह बसून समुद्रात त्यांच्या बरोबरीने सार्वभौमत्व सिद्ध होणार होते. अगदी याच राजकीय कारणाकरीता शिवाजी महाराजांनी समुद्रात आपले आरमार उभे करून भारतीय नेव्हीचा पाया घातल्याचे दिसून येते. 'दर्यास राजियांनी पालाण घातले' रघुनाथ बल्लाळ याची नेमणूक तळे, घोसाळे, राहपुरीपावेतो होऊनही सर्व दर्याकिनारा स्वराज्यासाठी मोकळा केला.[५]

## आरमाराचा विकास

आपली संरक्षण व्यवस्था ही सागरावरसुद्धा मजबूत असली पाहिजे हे शिवाजी महाराजांनी प्रथमतःच ओळखले होते. युरोपीयन सत्तांपासून स्वराज्याला धोका आहे हे ओळखणारा म्हणून शिवाजी महाराजांची आपण जितकी स्तुती केली तितकी कमी आहे. सागरावरील सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज यांच्यासारख्या शत्रुंच्या हालचाली पाहून शिवाजी महाराजांनी जहाजबांधणीकडे विशेष लक्ष दिलले आढळते.[६] इ.स. १६५७ मध्ये शिवाजी महाराजांनी कल्याण–भिवंडी घेतल्यावर कल्याणच्या खाडीत सुमुहूर्ताने आपल्या आरमारची पहिली पठाणे तरती केली व स्वराज्याच्या आरमार बांधणीस सुरूवात झाली. पोर्तुगीज दप्तरातील आधाराप्रमाणे शिवाजी महाराजांनी इ.स. १६५९ मध्ये मराठयांच्या आरमाराची मुहूर्तमेढ रोविली. त्याचा तपशील असा ''आदिलशहाचा बंडखोर सरदार शहाजी याच्या एका मुलाने वसई व चौलकडील प्रदेश काबीज केला असून तो बलिष्ट झाला आहे. त्याने काही लढाऊ गलबते समुद्रात फिरकू न द्यावी म्हणून पोर्तुगीज कॅप्टनला आम्ही आज्ञा केली आहे की त्याने सदर गलबते बाहेर येऊच देऊ नयेत''[७] वसईस जहाजे बांधणारे कुशल पोर्तुगीज कारागीर होते. रूय लैतावव्हियेगस् व त्याचा मुलगा फेर्नाव व्हियेगस लैताव या नौशिल्प्यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी महाराजांनी आपली पहिली वीस लढाऊ गलबते बांधण्यास सुरुवात केली होती. ही जहाजे आपण सिद्दयांविरोद्ध वापरण्याकरीता बांधीत आहोत असे शिवाजी महाराजांनी जाहीर केले होते. करण असे जाहीर केल्याशिवाय पोर्तुगीज त्यांच्या जहाजांना कल्याण–भिवंडीच्या खाडीतुन बाहेर समुद्रात पडू देणे शक्य नव्हते. या जहाज बांधणीच्या कामात तीनसेचाळीस पोर्तुगीज कारगीर व इतर लोक काम करीत होते. यांच्या बायकामुलासह ही संख्या बाराशेच्या वर होती असे दिसून येते. इ.स. १६८८ मध्ये विजरईने एक जाहीरनामा काढून मोगल, आदिलशहा व शिवाजी यांच्या सैन्यामध्ये नौकरीस असलेल्या पोर्तुगीज लोकांनी स्वदेशी परत जावे अशी आज्ञा केली. शिवाजी आरमार तयार झाल्यास शिवाजी महाराज सिद्दी बरोबर आपल्यालही त्रास होणार या भितीने शिवाजी महाराजांच्या नोकरीत असलेल्या पोर्तुगीजांनी शिवाजी महाराजांचे आरमार पूर्ण होण्यापूर्वी आरमारची नोकरी सोडून द्यावी, म्हणून वसईच्या कॅप्टन आंतोनियु द मेलू कास्त्रु याने असे प्रयत्न केले. त्याचा परिणाम म्हणून शिवाजी महाराजांकडे आरमारी नोकरीत असलेले सर्व पोर्तुगीज एकेदिवशी गुप्तपणे मुंबई व वसई येथून नोकरी सोडून पळून गेले. पण १६५७ ते १६५९ या कालावधीत शिवाजी महाराजांची वीस जहाजे तयार झाली होती.[८]

याच सुमारस सिद्दी, विजापूर व पोर्तुगीज यांच्या ताब्यातील भाग वगळून बाकीचा उत्तर कोकाण (कुलाबा जिल्हा) शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला होता. इ.स. १६६१–६३ मध्ये विजापूरकरांच्या दाभोळ बंदरावर शिवाजी महाराजांनी हल्ला केला. सुर्व्यांचे श्रंगापूर घेतले व राजापूर लुटले. यामुळे जवळजवळ सर्व रत्नागीरीची किनारा शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला होता. त्यामुळे आरमार वाढविण्याची आवश्यकता तीव्रतेने भासू लागली.[९]

चौलाच्या कॅप्टनने १९६४ मध्ये पोर्तगीज गव्हर्नरास लिहिलेल्या पत्रानुसार वरच्या चौलमध्ये शिवाजी शिवाजी पन्नास तारवे बांधीत होता आणि त्यातील सात तारवे बाहेर पडण्याच्या तयारीत होती. शिवाजीचे वाढते आरमारी सामर्थ्य ध्यानत घेऊन त्याच्या तारवांना समुद्रात जाण्यास मज्जाव करण्याचे पोर्तुगीजांचे धोरण होते. इ.स. १९६७ च्या अखेरीस शिवाजीच्या वाढत्या सामर्थ्याबद्दल विजरई कोंदी द सांव्हिसेंति याने एका पत्रात व्यक्त केलेले मत उल्लेखनीय आहे. ''शिवाजीचे नौदलही मला भीतीदायक वाटते. कारण त्यांच्या विरुद्ध आम्ही सुरुवातीस कारवाई न केल्यामुळे त्यांनी किनाऱ्यावरील किल्ले बांधिले आणि आज त्यांचा जवळ पुष्कळ तारवे आहेत, पण ही तारवे मोठी नाहीत.''[१०]

शिवाजी महाराजांनी जी जहाजे तयार करून आपले आरमार बनविले होते त्यात पुढील प्रकारची जहाजे विशेषत्वाने आढळून आली.

१. गुराबे, २. गलबते, ३. तरांडी, ४. तारू, ५. तीर काठी आणि ६. माचवा

शिवाजी महाराजांच्या आरमारावर काम करण्यास कोंकण किनाऱ्यावरील नौकायानात चतूर व अनुभवी खावी, कोळी, भांदेल वाघेर, मियाना इत्यादी हिंदी–मुस्लीम जमातीचा उपयोग करुन घेण्यात आला. या मनुष्य बळावरच मराठयाचे आरमार शिवाजी महाराजांनी निर्माण केली. आरमारात शिवाजी महाराजांनी 'सरखेल हे विशष पद निर्माण केले होते. या पदावर मुसलमानाची नेमणूक शिवाजी महाराजांच्या काळात होत असे. दर्यासरंगा हा पहिला सरखेल होय. **दर्यासारंग नंतर इब्राहीमखान, मायनक भंडरी, दौलतखान व सिद्दी मिस्त्री** हे शिवाजी महाराजांचे नामांकित आरमारी सेनापती होते. पुढे प्रसिद्धीस आलेले आंग्रेसुद्धा शिवाजी महाराजांच्या

आरमारात प्रमुख होते. शिवाजी महाराजांजवळ एकून सातशे लढाऊ जहाजे असल्याचे उल्लेख आढळून येतो. लढाऊ जहाजाप्रमाणेच शिवाजी महाराजांनी व्यापारी जहाजेसुद्धा बांधल्याचा उल्लेख आढळून येते. यामुळे शिवाजी महाराजांचा व्यापार इराण आणि अरबस्थान पर्यंत प्रस्थापित होऊ शकला होता. [११]

लढाऊ आरमाराला जवळच सुरक्षातळ लागतात. तेथे त्यांची दुरस्ती कोळसापाणी इत्यादी गरजा पूर्ण होतात व वाईट हवामानात सरंक्षण प्राप्त होते. शिवाजी महाराजांनी आपल्या लढाऊ व्यापारी जहाजांच्या वाढीबरोबरच संरक्षणक्षम सामुद्रिक किल्लेही पश्चिम किनाऱ्यावर बांधून आपल्या उत्कृष्ट नेतृत्वाचे प्रमाण दिले आहे. हे गड समुद्रातील खडकांवर किंवा अधिकाअधिक समुद्रवेष्टित पर्वत सुळक्यांवर बांधले होते. विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, रत्नगिरी व मालवणची किल्लेबंदी, सिंधुदुर्ग हे समुद्रिक किल्ले व कुलबा, जयगड, देवगड, रत्नागिरी, अंजनवेळ, राजापूर येथे गोदी कारखाने शिवाजीने निर्माण केलेत. हे सर्व आरमारी तळ उभारण्यामागे शिवाजी महाराजांचा उद्देश, जेथे जहाजे येऊ शकतील व बाहेर पडू शकतील अशा जागा निवडणे हा नव्हता उलट चांगल्या बंदराबद्दल त्यांचे विचार म्हणजे जेथे शत्रु सहजासहजी प्रवेश करु शकणार नाही. व आरमाराला नैसर्गिक सरंक्षण प्राप्त होईल अशी दुर्गम जागा होय.[१२]

## नि क र्

आपले पिता शहाजी राजे यांच्याकडून पुण्याची जहागीर प्राप्त झाल्यावर शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्य स्थापन करीत असताना स्वराज्यातील बहुतांश भाग हा आदिलशहाच्या वर्चस्वाखाली येत होता. त्यामुळे आदिलशहाशी शिवाजी महाराजांचा संघर्ष अटळ होता. शिवाजी महाराजांनी आदिलशहाच्या बहुतंश प्रदेशावर नियंत्रण प्राप्त केले. हे करीत असतांना शिवाजी महाराजांना असे लक्षात आले की ज्यांच्या जवळ सर्वात जास्त किल्ले आणि ज्याच्या जवळ आरमार तो बलशाली होऊ शकतो. त्यामुळेच कोकण किनाऱ्याचा बंदोबस्त लावतांना शिवाजी महाराजांनी आरमार निर्मितीकडे लक्ष दिले. कारण स्वराज्याचे मुख्य शत्रू आदिलशहा याच्या दरबारातील सिद्दी हा आरमाराच्या सहाय्याने कोकण किनाऱ्यावर शिवाजी महाराजांच्या प्रदेशात सतत लुटपाट करीत असे. याच बरोबर पोर्तुगीज, इंग्रज आणि अन्य पश्चिमात्य सत्तासुद्धा आरमाराच्या भरोस्यावर भारतातील प्रदेशांवर नियंत्रण ठेवत असत. त्यामुळेच शिवाजी महाराजांनी आरमार निर्माण करण्यावर भर दिला. शिवाजी महाराजांच्या हयातीत जरी सिद्दीवर आरमाराच्या सहाय्यतेने जरी नियंत्रण प्राप्त करत आले नाही तरी नंतरच्या काळात याच आरमाराने सिद्दी आणि पोर्तुगीजांवर बाजीराव पेशवेच्या काळात पूर्ण नियंत्रण प्राप्त झाले. हेही विसरता येत नाही. भारतात जरी जंजिऱ्याच्या सिद्दी पहिलांदा आरमार उपयोग केला असला तरी तो एक विदेशी होता. त्यामुळेच भारतात पहिलांदा भारतीय आरमार निर्माण करणारे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज हे होत. त्यामुळेच शिवाजी महाराजांना भारतीय नेव्हीचे संस्थापक म्हटल्या जाते.

## संदर्भ


१. देशमुख मा. मा., 'मध्ययुगीन भारताचा इतिहास', विश्वभारती प्रकाशन, नागपूर आवृत्ती तिसरी १९९८., पृ. क्र. ४७.
२. कित्ता
३. देशमुख पी. एन., 'मराठयांच्या इतिहासाचा मागोवा', प्रकाशक प्रदीप मुळे .ऋचा प्रकाशन ९, गजानन नगर, नागपूर, १५, प्रथमावृत्ती २००१ पृ. क्र. १९२.
४. कुलकणी अ. रा. आणि ग. ह. खरे, मराठयांचा इतिहास खंड पहिला शिवाजी आणि शिवकाल (१६०० ते १७०७) प्रकाशक .ऋतुपर्ण अनिरुद्ध कुलकर्णी कॉन्टिनेन्टल, विजयानगर, पुणे प्रथमआवृत्ती १९८४. पृ. क्र. ३०५.
५. कित्ता
६. डॉ. कोलारकर श. गो. मराठयांचा इतिहास' शिवयुग ते मराठेशाहीच्या अस्तापर्यंत (१६०० ते १८१८), श्री. मंगेश प्रकाशन नागपूर चतुर्थ आवृत्ती १९९७–९८, पृ. क्र. ११८
७. कुलकणी अ. रा. आणि ग. ह. खरे, मराठयांचा इतिहास खंड पहिला शिवाजी आणि शिवकाल (१६०० ते १७०७) प्रकाशक .ऋतुपर्ण अनिरुद्ध कुलकर्णी कॉन्टिनेन्टल, विजयानगर, पुणे प्रथमआवृत्ती १९८४. पृ. क्र. ३०५.
८. कित्ता पृ. क्र. ३०६
९. कित्ता
१०. कित्ता
११. डॉ. कोलारकर श. गो. मराठयांचा इतिहास' शिवयुग ते मराठेशाहीच्या अस्तापर्यंत (१६०० ते १८१८), श्री. मंगेश प्रकाशन नागपूर चतुर्थ आवृत्ती १९९७–९८, पृ. क्र. ११८
१२. देशमुख पी. एन., 'मराठयांच्या इतिहासाचा मागोवा', प्रकाशक प्रदीप मुळे .ऋचा प्रकाशन ९, गजानन नगर, नागपूर, १५, प्रथमावृत्ती २००१ पृ. क्र. १९३.